13-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

KBS/SBT/MHM. 14:15

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

अधिवेशनाचा शुभारंभ " **वंदे मातरम्** " या गीताच्या गायनाने झाला.

**औचित्याच्या मुद्याबाबत ....**

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, आजच्या या कार्यक्रम पत्रिकेवरील कार्यक्रम पाहिल्यानंतर खेदाने म्हणावेसे वाटते आहे की, या सदनातील आमचे एक सहकारी सदस्य, जे या सदनाचे विद्यमान सदस्य होते, त्यांचे दु:खद निधन झाले आहे आणि त्यांच्या निधना बद्दलचा शोक प्रस्ताव हा आपल्या प्रथेप्रमाणे सर्व कामकाजाच्या अगोदर घ्यावयाचा असतो पण या ठिकाणी तो शेवटी दाखविण्यात आलेला आहे. त्याबद्दल मी प्रथमत: खेद व्यक्त करतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर लगेचच शोक प्रस्ताव घेण्यात यावा आणि त्यानंतर इतर कामकाज घ्यावे. या क्रमाने कामकाज घेणे उचित होईल असे मला वाटते.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, आजची या सभागृहाची कामकाज पत्रिका पाहिल्यानंतर आपल्या सर्व पक्षांचा किंवा सदनाचा जो रिवाज आहे, सदनाच्या ज्या पद्धती आहेत त्यामध्ये शोक प्रस्तावाला प्राधान्य दिलेले आहे. विशेषत: विद्यमान सदस्यांना देवाज्ञा होते त्यावेळी सर्व प्रथम शोक प्रस्ताव घेतला जातो. मात्र आजच्या या कार्यक्रम पत्रिकेमध्ये त्याला शेवटचे, नवव्या क्रमांकाचे स्थान दिलेले आहे. हे योग्य नाही. त्यामध्ये दुरूस्ती व्हावी आणि माननीय राज्यपालांचे अभिभाषण सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर लगेचच शोक प्रस्ताव घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, समजा काही तांत्रिक अडचण असेल तरीही विरोधी पक्षाच्या वतीने मी आपल्याला सांगू इच्छितो की, या सदनाचे एक विद्यमान सदस्य असलेले प्रा. वसंत काळे यांचे निधन झालेले आहे. तेव्हा वाटल्यास, सत्तारूढ पक्षाच्या संमतीने आपण आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये बदल करावा. आजचे आपले इतर कामकाज हे उद्याही आपणास घेता येईल. तेव्हा आपण कै. वसंत काळे हे विद्यमान सदस्य होते हे लक्षात घेऊन त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबतचा शोकप्रस्ताव प्राधान्यक्रमाने घ्यावा आणि इतर कामकाज उद्या घ्यावे अशी विनंती आहे.

.... ए 2 ..



श्री. आर.आर.पाटील : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्याशी मी देखील सहमत आहे. परंतु मी आपल्या हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, आज येथे पुरवणी मागण्या आपल्याला सभागृहापुढे मांडावयाच्या आहेत. अर्थात ती बाब शेवटी घेतली तरी चालेल. शोक प्रस्ताव घेतल्यानंतर आपण सभागृहाची बैठक स्थगित करीत असतो आणि तसे झाले तर पुरवणी मागण्या आपल्याला सभागृहापुढे आज मांडता येणार नाहीत. म्हणून त्या आज सभागृहापुढे मांडल्या जाव्यात याच एका हेतूने हे कामकाज अगोदर घेऊन शोक प्रस्ताव शेवटी ठेवण्यात आला आहे.

श्री. विनायक मेटे : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जी सूचना येथे मांडली आहे ती योग्य आहे. विद्यमान सदस्य असलेले श्री.वसंत काळे हे आपल्या मधून निघून गेले आहेत, तेव्हा त्यांच्या बद्दलचा शोक प्रस्ताव हा इतर सर्व कामकाजाच्या अगोदर येणे आवश्यक होते. आता या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे असेच काही तांत्रिक कारण असले तरी ते बाजूला ठेवण्यास कोणाची हरकत असणार नाही. पण अगोदर शोक प्रस्ताव घेतला जावा या सुचनेला आमचे समर्थन आहे.

**सभापती** : या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्याशी मीही सहमत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव आज सभागृहासमोर ठेवला जाणार आहे. त्या नंतर पुरवणी मागण्या सादर केल्या जाणार आहेत. त्या देखील आपण येथे मांडून घ्याव्यात. ....

( यानंतर श्री. बरवड .... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनीही मान्य केले की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्यानंतर लगेच शोक प्रस्ताव घेतला पाहिजे. यामध्ये कामकाजाचा क्रम बदलला आहे. कामकाजाचा क्रम बदलून सर्व कामकाज झााल्यानंतर शोक प्रस्ताव घेणे ही या सभागृहाची प्रथा नाही. श्री. वसंत काळे हे या सभागृहाचे विद्यमान सदस्य होते. ते सभागृहाचे विद्यमान सदस्य असल्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्यानंतर शोक प्रस्ताव मांडावा आणि त्यानंतर सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करावे अशी मी विरोधी पक्षाच्या वतीने विनंती करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, विधान सभेमध्ये आज पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वसंत काळे हे या सभागृहाचे सदस्य होते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री. वसंत काळे हे आपल्या विधानपरिषद सभागृहाचे विद्यमान सदस्य होते आणि त्यांचा सदस्यत्वाचा कालावधी अजूनही चालू होता. ही वेगळी घटना आहे. ते सभागृहाचे माजी सदस्य नव्हते. या ठिकाणी सत्तारुढ आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूच्या सदस्यांची भावना आहे. पुरवणी मागण्या दोन दिवसानंतर मांडता येतील. त्यामध्ये अडचण नाही. यामध्ये सँक्टीटी आहे.

**सभापती** : या ठिकाणी सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कै. वसंत काळे हे या सदनाचे सन्माननीय सदस्य असतानाच दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झालेला आहे. या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्यानंतर दुखवट्याचा प्रस्ताव मांडण्यात येईल. बाकीचे जे कामकाज आहे ते आज न घेता या नंतरच्या काळात 16 मार्च, 2006 रोजी घेण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे.

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक 13 मार्च, 2006 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले अभिभाषण छापावे )

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्रीमती सुधा जोशी, वि. प. स. यांचा प्रस्ताव.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती सुधा जोशी यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही, या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

गुरुवार दिनांक 16 मार्च, 2006 रोजी व सोमवार, दिनांक 20 मार्च, 2006 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या मंगळवार, दिनांक 14 मार्च, 2006 रोजी, दुपारी 12.00 वाजेपर्यंत विधानमंडळ सचिवालयाच्या कक्ष क्रमांक 017 येथे आणून द्याव्यात.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : आज शोक प्रस्ताव असल्यामुळे आपला काही औचित्याचा मुद्दा असेल तर तो आपण 16 तारखेला घेऊ.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आज एक मोर्चा आलेला आहे. दीड लाख लोक या ठिकाणी आलेले आहेत...

**सभापती** : आज मी अन्य कोणत्याही कामकाजाला परवानगी देणार नाही. यानंतर शोक प्रस्ताव घेण्यात येईल.

----

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्री. वसंत शंकरराव काळे, वि.प.स., सर्वश्री ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे, माजी वि. प. स यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. वसंत शंकरराव काळे, विधान परिषद सदस्य, सर्वश्री ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो :-

" श्री. वसंत शंकरराव काळे, विधान परिषद सदस्य, सर्वश्री ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. वसंत शंकरराव काळे यांचा जन्म 1 एप्रिल, 1944 रोजी लातूर जिल्ह्यातील बोरगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले होते.

कै. काळे यांनी बोरगाव ग्राम पंचायतीचे सरपंच, लातूर तालुका सहकारी दूध संघाचे अध्यक्ष, उस्मानाबाद जिल्हा शेतकरी, शेतमजूर संघटनेचे अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, बोरगाव येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व औरंगाबाद येथील शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयाच्या "विद्यार्थी संसदे"चे अध्यक्ष म्हणून कार्य केले. विद्यार्थ्यांच्या, शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर त्यांनी सतत आंदोलने करुन त्यांच्या हिताचे कार्य केले. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेटचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले.

कै. काळे 1984 व 1999 मध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून व 2004 मध्ये औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 2 फेब्रुवारी, 2006 रोजी दुःखद निधन झाले.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

सभापती महोदय, एक अत्यंत लढाऊ, अभ्यासू आणि ज्यांनी शून्यातून येथपर्यन्त मजल मारली आणि समाजातील अनेक क्षेत्रामध्ये यशस्वी प्रतिनिधीत्व केले असा जिव्हाळ्याचा मित्र या सदनाने गमावला आहे. त्यांच्या निधनाबद्दल करावे तितके दु:ख थोडेच आहे.

त्याचप्रमाणे कै. ईश्वर बगाजी देशमुख यांचा जन्म 1 जुलै 1924 रोजी झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.एलएल.बी.,ओ.डी.(डेन्मार्क) पर्यन्त झाले होते.

कै. देशमुख यांनी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय भाग घेऊन कारावास सोसला होता. नागपूर महानगरपालिकेत नामनियुक्त सदस्य तसेच, नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले. महाराष्ट्र शासनाच्या शारीरिक शिक्षण पुनर्रचना समितीचे सदस्य व एस.टी.महामंडळाचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले. सिटिझन्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन त्यांनी अनेक शैक्षणिक उपक्रम राबविले. शिक्षण महर्षी अशी त्यांची ख्याती होती.

कै. देशमुख 1958 व 1960 असे दोन वेळा विदर्भ स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाचे सोमवार, दिनांक 6 फेब्रुवारी 2006 रोजी दु:खद निधन झ ााले.

त्याचप्रमाणे कै. देविदास नामदेव भोळे यांचा जन्म 13 मार्च 1934 रोजी जळगाव जिल्ह्यात भुसावळ येथे झाला. त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यन्त झाले होते.

कै. भोळे यांनी भुसावळ नगरपालिकेचे नगरसेवक व नगराध्यक्ष तसेच, भुसावळ कृषि उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. भुसावळ तालुका देखरेख सहकारी संघ व शेतकरी सहकारी संघाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात त्यांनी लक्षणीय कार्य केले.

कै. भोळे यांनी भुसावळ शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था तसेच पीपल्स चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही कार्य केले.

कै. भोळे 1986 मध्ये जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर तसेच, 1978मध्ये भुसावळ मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2006 रोजी दु:खद निधन झाले. यांनाही मी श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. कै. वसंत शंकरराव काळे हे आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य होते. 2004मध्ये मराठवाड्याच्या शिक्षक मतदारसंघातून ते याठिकाणी निवडून आले आणि 2 फेब्रुवारी 2006 रोजी ते आपल्यातून अचानक निघून गेले. त्यांच्या जाण्यामुळे संपूर्ण मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रावर अवकळा पसरली. शिक्षक प्राध्यापकांच्या प्रश्नाबाबत त्यांनी सतत आवाज उठविला. नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांचा प्रश्न, 900 माध्यमिक व उच्च माध्यमिक तुकड्यांचे अनुदान असे शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न त्यांनी धसास लावले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका ही योजना लागू करण्यात त्यांचाच हातभार होता. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ते विद्यापीठ विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष होते.

मराठवाडा विकास आंदोलनात तरुणांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. त्यांच्या राजकीय प्रवासाची खरी सुरुवात तेथूनच झाली. या विधानपरिषद सभागृहात त्यांचे संभाषण कसे असे ते आपण सर्वांनी अनुभवले आहे. एखाद्या शासकीय अधिका-याने भ्रष्टाचार केला असेल तर केवळ त्या शासकीय अधिका-यावर कारवाई करण्याइतपत त्यांचे समाधान होत नसे, तर त्या अधिका-यावर कारवाई न करणा-या वा कारवाई करण्यास टाळाटाळ करणा-या वरिष्ठ अधिका-यांवरही कारवाई करण्याचा ते आग्रह धरत. त्यांच्या या कार्यपध्दतीमुळे विधानपरिषद सभागृहापेक्षा विधानमंडळाच्या विविध समित्यांवर काम करताना त्यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उठविली. समित्यांच्या बैठकीत साक्षीला येणारे सचिव वसंतरावांच्या उपस्थितीने घाबरुन जात. कारण सत्ताधारी पक्षात असले तरी भ्रष्टाचारी अधिका-याबद्दल वसंतरावांच्या ठिकाणी काडीमात्र दयामाया नसायची. असा एक अभ्यासू. तळमळीचा कार्यकर्ता आपल्यातून अचानक निघून गेल्यामुळे सर्वांनाच याचा प्रचंड धक्का बसला आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 14:30

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, कै. वसंतराव काळे यांच्याप्रमाणेच कै. ईश्वर देशमुख हे सुध्दा फार जुने कार्यकर्ते होते. ते सुध्दा आपल्यातून निघून गेले आहेत. त्याचप्रमाणे कै. दे.ना. भोळे हे भुसावळचे अत्यंत कर्तव्यदक्ष असे कार्यकर्ते होते. भुसावळ आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये कै. भोळे यांचे नांव माहीत नाही असा एकही माणूस सापडणार नाही. त्यांचे कार्य भुसावळकरांच्या सतत स्मरणात राहील. भुसावळ हा भाग माझ्या जिल्हयाच्या शेजारी असल्यामुळे कै. भोळे आणि माझा जवळचा संबंध होता. शेतकऱ्यांसाठी सतत काम करण्याची कै. भोळे यांची धडाडी होती. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जेवढे म्हणून प्रश्न सोडविता येतील तेवढे सोडविण्याचा कै. भोळे यांनी प्रयत्न केलेला होता. असा एक अतिशय चांगला कार्यकर्ता आपल्यातून निघून गेला आहे. कै. वसंतराव काळे हे या सदनाचे विद्यमान सदस्य असल्यामुळे सभागृहाचे अतिशय नुकसान झ ालेले आहे. दिवंगत सदस्यांबद्दल सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी सहमत आहे. सर्व दिवंगत सदस्यांना मी आदरांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सन्माननीय सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव या सदनामध्ये मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. कै. वसंतराव काळे यांचा जन्म 1 एप्रिल, 1944 रोजी झाला होता. या सदनाचे ते विद्यमान सदस्य होते. गेल्या अधिवेशनापर्यंत त्यांचा आणि आमचा सहवास होता. त्यांचा सदस्यपदाचा कालावधी अद्याप शिल्लक असताना त्यांना देवाज्ञा झाली ही निश्चितच दु:खद घटना आहे. जन्माला आलेल्या माणसाला एक दिवस जायचे असतेच प्रश्नचिन्ह असते ते फक्त केव्हा ? ज्यावेळी उत्तर मिळते त्यावेळी त्याच्या कार्याची आठवण होते. सर्वसामान्य माणसाची वृत्ती अशी असते की, "असेल जोवरी सत्ता येती,मरता घेती खांद्यावरी "आपला समाज हल्ली भावनाशून्य बनत चालला आहे या पार्श्वभूमीवर या प्रश्नाकडे आम्ही पाहतो. कै. काळे यांनी या सदनामध्ये काम करीत असताना विविध विषयावर आपले विचार मांडले तसेच सहकारी चळवळीमध्ये त्यांनी भाग घेतला. दूध संघाच्या कार्यामध्ये भाग घेतला. एका राजकीय पक्षाचे ते चांगले कार्यकर्ते होते तसेच प्रवक्ते होते. त्यांच्यासारखे व्यक्तिमत्व हे सर्व ठिकाणी सापडत नाही. अशी निवडक माणसे जेव्हा सभागृहामध्ये येतात तेव्हा या सभागृहाची प्रतिष्ठा वाढविण्याचेच काम ते करतात. असे सदस्य त्यांचा कालखंड शिल्लक असतानाच आपल्यातून निघून गेले. या सदनाच्या प्रथा आणि परंपरा यांचा विचार केला तर अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अशा दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली वाहिली जाते. लोकसभेमध्ये सुध्दा अशीच पध्दत आहे. विद्यमान सदस्यांचे निधन झाले तर प्रथम श्रध्दांजली वाहिली जाते आणि दिवसभरासाठी सदनाचे कामकाज स्थगित केले जाते. त्यादृष्टीनेच आम्ही माननीय सभापतींना विनंती केली होती. कै. काळे यांचे निधन झाले याचे दु:ख तर आहेच परंतु ते असते तर त्यांचे आणखी विचार ऐकता आले असते आणि त्यांचे सहकार्य मिळाले असते. त्यांनी नवीन कल्पना मांडल्या असत्या ते आता आपल्यातून निघून गेलेले आहेत. आम्ही सर्वच सदस्य त्यांना मनापासून श्रध्दांजली वाहतो.

या सदनाचे दुसरे एक माजी सदस्य कै. ईश्वर देशमुख यांचा जन्म 1924 साली झाला. आज एका जैविक दृष्टिकोनातून विचार केला तर हल्ली माणसाचे सर्वसाधारण आयुष्य 70-80 वर्षाचे असते. आयुष्याचा स्पॅन ऑफ एज वाढलेला आहे. त्यादृष्टीने विचार केला तर कै. देशमुख यांचे देहावसान हे सर्वसाधारणपणे नैसर्गिकरित्या झालेले आहे. तरी पण ते या सदनाचे सदस्य होते. या सदनामध्ये त्यांनी विविध विषयावर भाषणे करुन आणि आपले विचार व्यक्त करुन ...3





श्री. मधुकर सरपोतदार ....

या सदनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचा आणि जनतेसाठी झगडण्याचा मार्ग विशिष्ट हेतूने त्यांनी साध्य केलेला होता. कै. देशमुख यांनाही मी श्रध्दांजली वाहतो.

यानंतर श्री. खर्चे पी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) E-1

PFK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. कानडे 14:35

श्री. मधुकर सरपोतदार ........

कै. देविदास नामदेव भोळे हे भुसावळ येथून स्थानिक प्राधिकारी संस्थांच्या माध्यमातून या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आलेले होते. त्यांचा जन्म 13 मार्च, 1934 रोजी झाला होता व जवळपास 72 वर्षे त्यांचे वय होते. माणसाचे साधारणत: वय 80 ते 85 पर्यंत असते, काही माणसे 100 वर्षापर्यंत देखील जगतात. मी एका कार्यक्रमाला गेलो असता त्या ठिकाणी एका शतायुषी असलेल्या माणसाचा सत्कार करण्याची संधी मला मिळाली होती. आपण जनरली एखादयाला "शतायुषी भव" असे म्हणतो परंतु त्या व्यक्तीने 100 वर्षे अगोदरच पूर्ण केलेली असल्यामुळे मी त्यांना शतायुषी भव असेही म्हणू शकत नव्हतो. तरी देखील मी त्यांना "दीर्घायुषी भव" म्हणून वेळ मारुन नेली. माणसाच्या जीवनात अनेक अशा घटना असतात त्यामध्ये त्यांचे मोठया प्रमाणात कॉन्ट्रीब्युशन असते व ते पूर्ण करुन एक परिपूर्ण जीवन जगण्याची संधी माणसाला प्राप्त होते म्हणूनच अशा व्यक्तींबद्दल आदर वाटतो व आपण कोणालाही दीर्घायुषी भव असे म्हणतो आणि याचे कारण तेच असते की, त्यांचा अनुभव अनेकांना मार्गदर्शक ठरतो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, कै. भोळे यांचे नांव माहिती नाही अशी मतदारसंघात एकही व्यक्ती नाही. हे खरेच आहे व अशाच प्रकारे काम केले पाहिजे की "मरावे परि किर्ती रुपी उरावे" अशा या तिनही नेत्यांना मी माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पुन्हा पाठिंबा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याच्याशी सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, श्री. वसंतराव काळे यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची काम करण्याची जी पध्दती होती त्याचा आपणा सर्वांनाच परिचय आहे. एकीकडे ते गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या स्टुडंट्स युनियनचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते आणि त्याच वेळेला त्यांच्या गावच्या ग्रामपंचायतीचे सरपंच देखील होते. साधारणपणे कामकाजाच्या अशा वेगवेगळया छटा त्यांच्याकडे आपल्ला पहायला मिळत होत्या. इकडे देखील सभागृहात निरनिराळया विषयांवर म्हणजेच माध्यमिक शाळांतील प्रश्नांपासून तर महाविद्यालयातील वेगवेगळे प्रश्न मग त्यात नेट, सेट परीक्षांच्या पात्रतेपर्यंतचे प्रश्न अशा प्रश्नांमध्ये ते भाग घेत असत. दूध उत्पादक संघाचे ते अध्यक्ष होते तर दुसरीकडे शेतकरी आणि शेतमजूरांच्या वेगवेगळया प्रश्नांना न्याय देणे अशा प्रकारे त्यांचे प्रयत्न चालत असत व ही लहान गोष्ट नाही परंतु त्यांच्या परीने ते प्रयत्न करीत असत. अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांमध्ये धडपड करणारा हा नेता आपणा सर्वांना जवळून परिचित होता. खरे म्हणजे त्यांची टर्म नुकतीच सुरु झ ालेली होती पण गेल्या दोन चार महिन्यांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचा सभागृहाच्या कामकाजामध्ये देखील तसा सहभाग जाणवत नव्हता. अशा नेत्याचे दु:खद निधन झालेले आहे त्याबद्दल मी मनापासून दु:ख व्यक्त करतो.

यानंतर कै. ईश्वर बगाजी देशमुख हे आमच्या भागातून निवडून आलेले कॉंग्रेसचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक व स्वातंत्र्य चळवळीमध्ये कारावास भोगलेले व्यक्तिमत्त्व होते. मुख्य म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात फिजिकल एज्युकेशन हा त्यांचा महत्वाचा भाग राहिलेला आहे. कामाचा प्रवास जसजसा पुढे सरकत असतो तसतशी कामाची पायाभरणी करण्यात विसर पडत जातो व त्यामुळे वाईट वाटण्याचे कारण नाही पण फिजिकल एज्युकेशनमध्ये त्यांनी जे काम केलेले आहे ते भविष्यात मार्गदर्शक ठरणार आहे. या ठिकाणी राज्याच्या समित्यांवर सुध्दा काम करण्याची त्यांना संधी मिळाली होती. दोन वेळा या सभागहाचे ते सदस्य म्हणून होते. अशा नेत्याला मी आदरांजली अर्पण करीत आहे.

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .......

तसेच श्री. देविदास नामदेव भोळे यांच्याबरोबर काम करण्याची मला संधी मिळालेली आहे. अतिशय दिलखुलास असे व्यक्तिमत्त्व म्हणून ते परिचित होते. भुसावळचे नगराध्यक्ष म्हणून ते बरीच वर्षे होते. एक दोन वर्षे एका समितीवर त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी देखील मला प्राप्त झालेली आहे. समितीच्या दौऱ्याच्या निमित्ताने त्यांचा नेहमीच भुसावळहून गाडी पकडण्याचा आग्रह असायचा. कारण त्यांच्या भागातील प्रसिध्द असे काटेरी वांग्याचे भरीत खाण्यासाठी ते आग्रहाने आमंत्रण देत असत. त्यांच्या घरी गेलो असता मी पाहिले आहे की, नगरपरिषदेच्या कामकाजामुळे लोकांची मोठया प्रमाणात ये-जा असायची, त्यांचा संपर्क मोठया प्रमाणात होता. तसेच त्यांची वागण्याची व लोकांचे प्रश्न समजावून घेण्याची पध्दती एकदम चांगली होती. हे व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून निघून गेलेले आहे. त्यांच्या व इतर सभासदांच्या दु:खद निधनाबद्दल मी पुन्हा आदरांजली अर्पण करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे (उपसभापती) : आदरणीय सभापती महोदय, सदनाच्या नेत्यांनी दिवंगत सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंत शंकरराव काळे, ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझ्या सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

या शोक प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. कै.ईश्वर देशमुख व कै.देविदास भोळे हे सन्माननीय सदस्य फार जुने, जाणते ज्येष्ठ नेते होते. या दोघांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

कै.वसंत शंकरराव काळे हे सभागृहाचे विद्यमान सन्माननीय सदस्य होते. त्यांचे दिनांक 2 फेब्रुवारी 2006 रोजी दु:खद निधन झाले. कै.काळे यांच्या कार्यशैलीबद्दलच सर्वांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना कै.वसंतराव काळे यांनी स्वत:ची प्रतिमा आणि ठसा उमटविला होता. विधिमंडळाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली होती, इतके नव्हे तर विधिमंडळाच्या माध्यमातून त्यांनी प्रखर भूमिका देखील मांडली होती. ऋतुरूपी वसंताचे आगमन होत असतानाच शैक्षणिक क्षेत्रात राजकीय क्षितिजावर स्वकर्तृत्वाने ठसा उभारणारा हा वसंत मात्र कायम काळाच्या पडद्याआड गेला हा दैवदुर्विलास आहे. कै.काळे यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक कार्य पाहिल्यानंतर मला स्वत:ला असे म्हणावसे वाटते की,

"उधळू नका हो फुले तयावर,
जन्मभरी तो फुलतच होता,
जाळू नका हो कलेवर तयाचे
जन्मभरी तो जळतच होता."

शेवटी, पुन्हा एकदा या सगळया दिवंगत नेत्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

..2...

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, सदनाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर मी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

या सदनाचे विद्यमान सन्माननीय सदस्य श्री.वसंत काळे यांचे दिनांक 2 फेब्रुवारी 2006 रोजी दु:खद निधन झाले. मराठवाडयाचा सुपुत्र गेल्याने मला जास्त दु:ख होत आहे. कै.काळे यांनी स्वत:ला महाराष्ट्रव्यापी प्रश्नामध्ये व्यापून घेतले नाही, तर मराठवाडयातील विविध प्रश्नांचा ध्यास घेऊन काम केले. माझा त्यांच्याशी गेले 10-12 वर्ष संबंध, संपर्क होता, मैत्री होती. मराठवाडयातील कुठल्याही प्रश्नावर पोटतिडकीने भाग घेणे, गरज पडल्यास स्वजनांशी फारकत घेण्याची देखील त्यांची तयारी असे. त्यांच्या कधीही मनात आले की, ते माझ्याकडे येऊन बसत. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अमुक झाले पाहिजे, तमुक झाले पाहिजे, असे ते विचार मांडत. मराठवाडयातील शेतीच्या, दुष्काळाच्या, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंबंधी ते प्रामुख्याने चर्चा करीत असत. शैक्षणिक क्षेत्रात तर त्यांचा स्वत:चा असा हातखंडा होता, नव्हे तो त्यांचा अधिकार होता. या सदनाचा सदस्य म्हणून मराठवाडयाचे प्रश्न मांडण्यासंबंधीची त्यांची आत्यंतिक तळमळ होती. एवढचे नव्हे तर विधान सभेच्या सभागृहामध्ये कोणत्या आयुधाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करता येतील काय ? यासाठी देखील ते प्रयत्न करीत असत. लातूर मधून श्री.शिवराज पाटील-चाकूरकर यांच्याकडून ते पराभूत झाले.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

दोन वेळा त्यांनी पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला आणि ते पराभूत झाले. त्यानंतर श्री.जयसिंगराव गायकवाड यांच्या विरोधात त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थातून निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला आणि त्या ठिकाणी सुध्दा ते पराभूत झाले. त्यानंतर मात्र 1984 आणि 1999 मध्ये ते विधानपरिषदेवर निवडून आले. त्यानंतर श्री.श्रीकांत जोशी यांच्या विरोधात पदवीधर मतदारसंघातून पराभूत झाले. परंतु पराभूत झाल्यानंतर ते गप्प बसले नाहीत. त्यांनी पुन्हा श्री.जोशी यांच्या विरोधात रिट-फाईल केली आणि तेव्हा श्री.जोशी यांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला. त्यानंतर शिक्षक मतदारसंघातून ते उभे राहिले आणि प्रचंड मताधिक्याने निवडून आले. तेव्हापासून या सभागृहात आम्ही त्यांचे रुप पाहत होतो. विरोधी पक्षाचा एक सदस्य सत्ताधारी बाकावर जाऊन का बसला असा प्रश्न कधीकधी आम्हाला पडत असे. त्यांनी सरकारची बाजू घेतल्याचे एकही उदाहरण वा प्रसंग मला तरी आठवत नाही. ते सत्ताधारी बाजूचे जरी असले तरी सरकार योग्य रितीने चालत नसल्याचा आत्मसंताप या प्रामाणिक सदस्याच्या माध्यमातून व्यक्त होता होता. सरकारकडून राज्यामध्ये योग्य प्रकारे काम होत नाही असे प्रतिबिंब त्यांच्या माध्यमातून दिसत असे. मला त्यांच्या संदर्भातील एक प्रसंग आठवतो. सभापती महोदय, एका प्रश्नाच्या संदर्भात कै.वसंतराव काळे आपल्यासमोर येऊन बसले होते. त्यांनी अल्प बचत योजनेमधील भ्रष्टाचाराच्या गुंतवणुकी संदर्भातील प्रश्न दोन दिवस लावून धरला होता. हा प्रसंग ज्यावेळी घडला त्याच्या तिसऱ्या दिवशी ते निवृत्त झाले होते. त्यानंतर ते माझ्याकडे आले आणि अल्प बचत योजनेतील भ्रष्टाचारासंदर्भातील सर्व माहिती माझ्याकडे दिली आणि मला म्हणाले की, ज्यांनी हा भ्रष्टाचार घडवून आणला आहे त्याला सोडू नका.

तसेच त्यांचा दुसरा प्रसंग अनुशेषासंदर्भातील आठवतो. अनुशेषासंदर्भात महाराष्ट्रात वातावरण तापले होते. मराठवाडा आणि विदर्भ हा कायम अनुशेष दूर करण्याच्या बाबतीत वंचित राहिलेला प्रदेश आहे. मराठवाडयाला आणि विदर्भाला सिंचनामध्ये झुकते माप न मिळाल्यामुळे हा भाग मागासलेला राहिला आहे अशा प्रकारची तीव्र भावना जनमानसात पसरली होती. तेव्हा श्री.वसंतराव काळे मला म्हणाले की, हा प्रश्न आपण हाती घेतला पाहिजे. माजी आमदार श्री.गव्हाणे आणि श्री.काळे यांनी एकत्र येऊन, मराठवाडयाच्या पाणी प्रश्नाबाबत रान पेटविण्याचे ठरविले आणि गावांगावांत बैठका घेण्यास सुरुवात केली. मी वर्तमानपत्रामध्ये वाचले होते की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

श्री.गव्हाणे यांनी असे सांगितले की, परभणी जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये नांदूर-मधमेश्वरचे पाणी आल्याशिवाय हा प्रश्न मिटणार नाही. तेव्हा मी श्री.वसंतराव काळे यांना सांगितले की, नांदूर-मधमेश्वरच्या पाण्याचा संबंध केवळ संभाजीनगर आणि त्या लगतच्या दोन-तीन तालुक्यांपुरताच आहे. या पाण्याचा मराठवाडा आणि परभणीशी काहीएक संबंध नाही. यासंदर्भात त्यांनी तज्ज्ञांशी बैठका घेतल्या. सर्व परिस्थिती जाणल्यानंतर मात्र त्यांनी टेक-ऑफ घेतला. मला वाटते विद्यमान सदस्य श्री.विनायकराव मेटे हे सुध्दा त्यावेळी दोन-तीन परिषदांमध्ये असतील. श्री.वसंतराव काळे यांनी उस्मानाबाद-धाराशीव येथे परिषद घेण्याबाबत मला सांगितले होते. खरे म्हणजे श्री.गोविंदभाई श्रॉफ यांचे निधन झाल्यानंतर मराठवाडयामध्ये पाणी प्रश्न बेवारस पडला होता. म्हणून श्री.वसंतराव काळे यांनी व्यासपीठ उभे केले. परंतु आता ते व्यासपीठ तहकूब झाल्याची माझ्यासारख्या कार्यकर्त्याला खंत वाटते आहे. वास्तविक पाहता श्री.वसंतराव काळे यांचा सरकारला धाक वाटत होता. श्री.काळे उभे राहिल्यानंतर सरकारचे काय वाभाडे काढतील याची भिती सरकारला वाटत होती.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, विद्यमान सन्माननीय सदस्य श्री. काळेंना ते ग्रामीण भागात असताना एक ॲटॅक आला. त्यांना त्यावर कोणत्याही प्रकारचे औषधोपचार मिळाले नाहीत. त्यानंतर ते जेमतेम मुंबईपर्यंत पोहोचले. सभापती महोदय, मराठवाड्यातील जनतेला कोणते भोग भोगावे लागत आहेत, याचे ते ज्वलंत उदाहरणच देऊन गेले. त्यांनी आपल्या सर्वांना दाखवून दिले की, माझ्यासारख्या आमदाराची व्यवस्था होऊ शकत नसेल तर ग्रामीण भागातील जनतेची स्थिती काय असेल ? मराठवाड्याच्या मातीशी एकरुप झालेला, तेथील जनतेच्या समस्यांसाठी झुंजणारा, वेळ पडल्यास कोणत्याही प्रकारच्या गांधीतत्वाला न जुमानणारा, मराठवाड्याशी समरस असणारा एक कार्यकर्ता आमच्यातून निघून गेला आहे याचे आम्हाला अतीव दु:ख आहे. मराठवाड्यातील जनतेला देखील या विषयी दु:ख आहे. तसेच शिक्षण क्षेत्रात व शेतकरी वर्गामध्ये देखील खेद आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहातील माजी सदस्य सर्वश्री ईश्वर बगाजी देशमुख, देविदास नामदेव भोळे यांच्याबद्दल देखील शोकप्रस्ताव मांडलेला आहे. तरी, मी त्या सर्वांच्या आत्म्यास ईश्वर शांती देवो, अशी प्रार्थना करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्रीमहोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावासंदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आपल्या सभागृहाचे विद्यमान सदस्य श्री. वसंत शंकरराव काळे, व माजी विधान परिषद सदस्य सर्वश्री ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे यांचे दुःखद निधन झाले आहे. सभापती महोदय, श्री. वसंत काळे हे मराठवाड्याचे सुपुत्र तर होतेच पण आपल्या सभागृहाचे सोबती देखील होते. त्यांनी सन 2004 मध्ये औरंगाबाद शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढविली. त्यावेळी त्यांचे आम्हाला पत्र आले की, आपण मला पाठिंबा द्यावा. सभापती महोदय, लातूरच्या निवडणूक कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यासाठी त्यांनी जेव्हा मला बोलाविले तेव्हा त्यांच्याशी माझी पहिल्यांदा ओळख झाली. मराठवाड्याचा विकास, पाण्याचा प्रश्न, रेल्वे रुंदीकरणाचा प्रश्न, शिक्षक-विद्यार्थ्यांचा प्रश्न, शेतकऱ्यांचा प्रश्न, मराठवाड्यातील उपेक्षित वर्गाचा प्रश्न, दलितांचा प्रश्न, आदिवासींचा प्रश्न, ओ.बी.सीं. चा प्रश्न, अल्पसंख्यांक समाजाचा प्रश्न या संदर्भातील त्यांची आत्मियता अत्यंत वाखाणण्यासारखी होती. सभापती महोदय, आपल्या सभागृहामध्ये त्यांनी अनेक प्रश्नांवर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी मांडलेले मुद्दे आमच्यासारख्या नवख्या कार्यकर्त्यांना दिशादर्शक, मार्गदर्शक ठरले. अत्यंत बुध्दिमान, अत्यंत निरलस व्यक्तिमत्वाचा, अभ्यासू, चिकित्सक वृत्तीचा असा हा अभ्यासक सदस्य आज आपल्यातून अकाली, अवेळी निघून गेला आहे, याचे निश्चितच अतीव दुःख आहे. सभागृहामध्ये अनेक समस्यांबाबत आवाज उठविताना त्यांनी शिक्षकांच्या संदर्भातील जीवघेण्या प्रसंगांना, त्यांच्यावर होणारा अत्याचार व अन्याय यांना वाचा फोडली. त्यांनी सभागृहाच्या माध्यमातून शिक्षकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत अभ्यासू वृत्तीचे होते. त्यांनी केवळ शिक्षकांच्या संदर्भातच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या संदर्भात देखील प्रश्न मांडले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रकारचे शिक्षण द्यावे अशी त्यांची भूमिका होती. मराठवाड्यातील जो अनुशेष आहे, मग तो सिंचनाचा अनुशेष असेल, विकासाचा अनुशेष असेल, औद्योगिक विकासाचा अनुशेष असेल, या सर्व बाबींसंदर्भात त्यांनी अत्यंत परखड असे मत या सभागृहात मांडण्यास मागेपुढे पाहिले नाही.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 14:55

प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...

ते सत्ताधारी पक्षाचे सदस्य असले तरी त्यांनी प्रांजळपणे, निर्भयपणे व अत्यंत उत्कृष्ट असे कार्य केलेले आहे. ते निर्भय प्रवृत्तीचे होते, त्यांनी सभागृहामध्ये नि:स्पृह असे काम केलेले आहे. त्यांची सभागृहाची मुदत संपण्यापूर्वीच त्यांच्या आयुष्याची मुदत संपली ही अत्यंत दुर्दैवी व दु:खाची गोष्ट आहे. कै. वसंत शंकरराव काळे यांच्या दु:खद निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

दुसरे माजी सदस्य श्री. ईश्वर बगाजी देशमुख हे पूर्व विदर्भातील एक ख्यातनाम व्यक्तिमत्व होते. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात विशेषत: शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये पूर्व विदर्भात म्हणजेच नागपूर भागात जे कार्य केलेले आहे ते कोणीही विसरु शकणार नाही. सभापती महोदय त्यांचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय होते. त्यांनी राज्यपातळीवर, राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट खेळाडू तयार करण्याचे काम शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये शारीरिक शिक्षणाची भावना रुढ केलेली आहे. विदर्भाचे प्रश्न असतील, विदर्भ विकासाचे प्रश्न असतील, स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीचा विषय असेल, त्या संदर्भातील चळवळ असेल या सर्व प्रश्नांना श्री. ईश्वर बगाजी देशमुख यांचा पाठिंबा होता, हे आम्ही कदापिही विसरु शकणार नाही. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात कार्य केल्यामुळे त्यांना पूर्व विदर्भातील लोक शिक्षण महर्षि म्हणत, तसेच त्यांनी सामाजिक क्षेत्रातसुध्दा अनेक चांगली कामे केलेली आहेत. त्यांनी नागपूर विभागात विविध जाती, जमातीमध्ये कामे केलेली आहेत, त्यांनी कोणतीही उणीव भासू दिली नाही. सदर जाती जमातींच्या कोणत्याही समस्या सोडविण्याचे काम त्यांनी केलेले आहे. हया सर्व बाबी आम्ही कधीही विसरु शकणार नाही. एक ख्यातनाम व्यक्तिमत्व म्हणून त्यांना पूर्व विदर्भ ओळखत होता त्यांच्या बद्दल मी शोक व्यक्त करतो.

यानंतर श्री. देविदास नामदेव भोळे हे भुसावळ येथून नगरसेवक ते नगराध्यक्ष तसेच पुढे कृषी पंचायत समितीचे सदस्य ते सन्माननीय सदनाचे सदस्य असा त्यांनी प्रवास केलेला आहे. तसेच भुसावळ व जळगाव जिल्हयांच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांनी दिलेले योगदान आमची जळगांव जिल्हयातील जनता कधीही विसरु शकणार नाही. श्री.वसंत शंकरराव काळे, श्री. ईश्वर बगाजी देशमुख व श्री. देविदास नामदेव भोळे या तिन्ही सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पिपल्स् रिपब्लिकन पार्टीतर्फे शोक व्यक्त करतो, व माझे दोन शब्द संपवितो.

----------

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. आर.आर.पाटील उपमुख्यमंत्री यांनी श्री. वसंत शंकरराव काळे, वि.प.स. श्री. ईश्वर बगाजी देशमुख व श्री. देविदास नामदेव भोळे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. ईश्वर बगाजी देशमुख व श्री. देविदास नामदेव भोळे यांच्याशी माझा व्यक्तिश: परिचय नव्हता. या सभागृहात त्यांनी काम केले, सभागृहाच्या बाहेर त्यांनी त्या त्या भागात शैक्षणिक, सामाजिक कामे केली. त्या भागातील शैक्षणिक व सामाजिक प्रश्न मांडण्याचा त्यांनी सभागृहात प्रयत्न केलेला आहे अशा भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. त्यांच्या बद्दल मी शोक व्यक्त करतो.

सभापती महोदय श्री. वसंत शंकरराव काळे, वि.प.स. हे आमचे जवळचे मित्र होते.

यानंतर श्री. सांगळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ....

सन 2004 मध्ये श्री.वसंत काळे मराठवाडा शिक्षक मतदारसंघातून निवडून आले होते. त्यांच्या दु:खद निधनाची बातमी मला या ठिकाणी बसलेले राज्यमंत्री माननीय श्री.राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील यांनी दिली. त्यावेळी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे असे दोघे जण श्री.वसंत काळे यांच्या जन्मगावी गेलो. त्यावेळी आम्हाला कै.वसंत काळे यांची किती मोठी लोकप्रियता होती याची प्रत्यक्षात जाणीव झाली. कै.वसंत काळे यांच्या शेवटच्या प्रवासामध्ये आम्ही सहभागी झालो. हजारो लोक मिळेल त्या वाहनाने त्यांच्या अंत्य विधीसाठी बोरगाव येथे पोहचले. त्या ठिकाणी एक शोकसभा झाली त्या शोकसभेला मी सुध्दा उपस्थित होतो. कै.वसंत काळे तीन वेळेस या सभागृहाचे सदस्य म्हणून कार्यरत होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला होता की, सन 2004 पूर्वी शिक्षक मतदारसंघातून निवडून येण्यापूर्वी कै.वसंत काळे पदवीधर मतदारसंघामध्ये सुध्दा उभे राहिले होते. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी त्यांचा पराभव केला होता. कै.वसंत काळे यांनी आपला पराभव झाल्यानंतर घरी न बसता पुन्हा शिक्षक मतदारसंघामध्ये निवडणूक जाहीर झाल्यानंतर उभे राहिले व चांगल्या मतांनी निवडून आले. सन 2004 मध्ये कै.वसंत काळे शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यावेळी त्यांचे मुद्देसूद भाषणे ऐकण्याची आम्हाला संधी प्राप्त झाली. कै.वसंत काळे हे अभ्यासू व्यक्तिमत्व होते. या सभागृहामध्ये सहकाराच्या संदर्भात चर्चा होत असताना सहकारामध्ये बोकाळलेल्या भ्रष्टाचाराबाबत ते अतिशय पोटतिडकीने, सडेतोडपणे शब्दांचे सपासप वार करीत असत. शिक्षकांचा प्रश्न असो, शेतक-यांचा प्रश्न असो, बेकार तरुणांचा प्रश्न असो किंवा मराठवाडयातील अनुशेषाच्या संदर्भातील चर्चा असो या सर्व प्रश्नांच्या संदर्भात त्यांनी सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर सुध्दा अतिशय चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. असा एक जवळचा मित्र आज आमच्या मध्ये राहिलेला नाही. मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने या सभागृहाचे सन्माननीय दिवंगत नेते कै.वसंत काळे, कै.ईश्वर देशमुख आणि कै.देविदास भोळे यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द संपवतो.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहाचे आतापर्यंत सदस्य असलेले कै.वसंत काळे वि.प.स. आणि कै.ईश्वर देशमुख व कै.देविदास भोळे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला मी सहमती दर्शवित आहे. खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.वसंत काळे आणि माझा फक्त निवडणुकीपुरताच परिचय होता असे नाही. कै.वसंत काळे सगळयांपेक्षा वेगळया व्यक्तिमत्वाचे होते. संपूर्ण मराठवाडयाची माहिती असणारी खूप कमी माणसे आहेत. सन 1984 मध्ये कै.वसंत काळे यांची झालेली निवडणूक मी अतिशय जवळून बघितली आहे. सन 1967 साली श्री.शिवराज पाटील यांच्या विरुध्द निवडणूक लढविणारे कै.वसंत काळे हे होते याची कदाचित सभागृहाला माहिती नसेल. तेरणा कारखान्याच्या निवडणुकीच्या वेळी श्री.पद्मसिंह पाटील यांच्या विरुध्द लॉबी करणारे कै.वसंत काळे हेच होते. डी.सी.सी. बँकेची धाराशिवची निवडणूक असो किंवा लातूरची निवडणूक असो, प्रस्थापितांच्या विरुध्द निवडणूक लढविण्याचे धाडस कै.वसंत काळे यांच्यातच होते. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे मांजरा कारखाना असेल किंवा तेरणा कारखाना असेल तेव्हापासून ते शिक्षक मतदारसंघात निवडून आल्यापर्यंत आमचा परिचय होता. मी सुप्रीम कोर्टाच्या एका केसमध्ये अडकलो असताना हिवाळी अधिवेशनामध्ये सुरुवातीचे सहा दिवस कै.वसंत काळे मला दिसले नाहीत. त्यावेळी मी त्यांना आपण काय करीत होता असे विचारले असता त्यांनी मला सिनेटची निवडणूक लढवत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना विचारले की, मी इकडे दिल्लीत अडकलो असताना आपण कोणाशी लढत होता ? त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, ...

( यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

तुझी काही आता अडचण नाही. आपण आता मराठवाड्याचे प्रश्न बघू. पण आता आमच्याच पक्षाचे काही लोक आहेत,... मी आता येथे त्यांची नावे घेणे काही बरोबर नाही म्हणून नावे घेत नाही., पण त्यांच्या विरूद्ध देखील लढले पाहिजे. कारण प्रस्थापित असे जे कोणी शिक्षण सम्राट असतील तर त्यांच्या विरूद्ध देखील निवडणूक लढविली पाहिजे. अशा प्रकारे प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन निवडणूक लढविण्याची जबरदस्त इच्छा आणि इच्छाशक्ती असलेले वसंत काळे हे मला वाटते सगळ्या राजकीय व्यक्तिमत्त्वांमध्ये एक आगळे वेगळे व्यक्तिमत्त्व होते. नेहमी आमचा संघर्ष व्हायचा. तसा त्यांचेशी संघर्ष मी टाळावयाचो कारण ते माझ्यापेक्षा वडील होते. पण त्यांच्या यश आणि अपयश या दोन्हींचे जवळून निरीक्षण करणारा मी एक कार्यकर्ता होतो. मला 1984 ची पदवीधर मतदारसंघातील निवडणूक आठवते आहे. त्यावेळेस ते पहिल्यांदा आमदार झाले. त्यापूर्वी तो मतदार संघ खानदेश आणि मराठवाडा असा मिळून होता आणि पदवीधर मतदारसंघ म्हटला म्हणजे तेथून भारतीय जनता पक्षाचा उमेदवार हमखास निवडून येणार अशी एक निश्चित अशी पूर्वपीठिका त्या मतदारसंघाच्या स्थापनेपासूनची होती. परंतु 1984 साली पहिल्यांदा भारतीय जनता पक्षाला त्या मतदारसंघातून पराभवाचे धडे शिकविण्याचे काम वसंतराव काळे यांनी केले. त्यावेळेस त्यांच्या विरूद्धचे उमेदवार होते श्री.सुरेश हिरे. त्या निवडणुकीमध्ये एक कार्यकर्ता म्हणून काम मी करीत होतो. संपूर्ण मिडिया आणि प्रसार माध्यमांच्या तोंडी श्री.सुरेश हिरे हे शंभर टक्के निवडून येणार असेच म्हटले जात होते. पण असे वाटत असताना श्री.वसंतराव काळे तेथून निवडून आले. त्यामध्ये श्री.कमल किशोर कदमांचे मोठे योगदान असले तरी त्याबाबत मी जेव्हा सगळ्यांना विचारले की हे असे कसे झाले ? तेव्हा मला सांगण्यात आले की, तुम्ही मिडियाच्या प्रेमामध्ये राहिलात, त्यामध्येच तुम्ही गुरफटून राहिलात आणि मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यामध्ये शेवटपर्यंत म्हणजे अगदी टोका-टोकापर्यंत पोहोचणारे श्री.वसंत काळे बऱ्याच ठिकाणी तुम्हाला मात करून गेले. म्हणूनच थोड्याशा मताने का होईना श्री.वसंतराव काळे हे 1984 ला पहिल्यांदा निवडून आले. त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुका आणि त्यांचा प्रत्येक संघर्ष मी जवळून पाहिला आहे. त्यामुळेच श्री.वसंतराव काळे यांच्या विरोधात निवडणूक लढविणे ही सोपी गोष्ट नव्हती हे मला माहीत होते. त्यामुळे त्या निवडणुकीची तयारी ही तेव्हापासूनच केली होती. त्याप्रमाणे 1990 आणि 1996 च्या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांना श्री.जयसिंगराव गायकवाड यांनी जरी पराभूत केले असले

.... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

तरी प्रत्येक मोहिमेमध्ये, प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक आंदोलनामध्ये न चुकता, न थकता प्रत्येक ठिकाणी स्वत:ची हजेरी लावणारे आणि त्यांच्या बरोबर जे कोणी कार्यकर्ते असतील त्यांना बरोबर घेऊन त्या कार्यामध्ये स्वत:चा जीव झोकून देऊन काम करणारे असे श्री.वसंतराव काळे हे एक वेगळेच व्यक्तिमत्त्व होते. 1999च्या पोट निवडणुकीमध्ये ते ज्या पद्धतीने निवडून आले ती देखील खूप बघण्यासारखी होती. त्यावेळेस सत्ता भाजप-सेनेची होती. पण पोटनिवडणूक लागल्यानंतर आम्हाला सहज सोपी वाटणारी निवडणूक त्यांनी ज्या पद्धतीने, जी राजकीय समीकरणे जुळवून जिंकून घेतली त्यातून त्यांचे राजकीय चातुर्य लक्षात येत होते. पण 2002 च्या निवडणुकीनंतर श्री.वसंतराव काळे आता पुन्हा निवडणुकीस उभे राहतील आणि जोरात झेप घेतील असे कोणालाच वाटले नव्हते. कारण माझ्या विरोधातील ती निवडणूक होती आणि सर्वच असे म्हणत असत की, श्री.वसंतराव काळे यांना निवडणुकीतील पराभव पचलेला नाही. त्यामुळे आता वसंतराव पुन्हा उभेच राहणार नाहीत. आम्हा दोघांचेही तसे पाहिले तर निवडणुकांमध्ये कॉमन मित्र खूप होते. त्यामुळे पदवीधरांचा मतदार हा नेमक्या कोणाच्या बाजूने आहे हे शेवटच्या दिवसापर्यंत कळत नव्हते आणि शेवटच्या क्षणापर्यंत कोण निवडून येणार हेही कळत नव्हते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा त्यांचा पराभव झाला त्यानंतरच्या लगेचच्या काही बैठकांमध्ये आमची काही वेगवेगळ्या कारणांनिमित्त भेट व्हायला लागली तेव्हा लक्षात आले की, फक्त 10 ते 15 दिवसात वसंतराव काळे हे जोरात उभे राहिले आहेत आणि जोमाने कामाला लागले आहेत. केवळ कोर्टातच त्यांनी मला अडकविले अशातील भाग नाही तर जेथे जेथे मी जाई तेव्हा माझ्या लक्षात येत होते की, मराठवाड्याच्या काना कोपऱ्यामध्ये ते पोहोचले आहेत. कित्येक वेळा एखाद्या ठिकाणी एखाद्या बैठकीसाठी मी पोहोचलो नाही तर मला फोन यायचा की, वसंतराव काळे आलेले आहेत बर का., तेव्हा तुम्ही लवकर येऊन जा. म्हणजे सगळ्या पद्धतीने स्वत:ला जनतेमध्ये ठेवणारा, आणि जनतेचे जे काही प्रश्न असतील ते घेऊन स्वत:ला रममाण करणारा असा हा आगळा वेगळा कार्यकर्ता होता. म्हणूनच ते शिक्षक मतदारसंघातून उभे राहिले आणि त्यांनी ती निवडणूक जिंकली. मला फक्त त्यांची दोनच वैशिष्ट्ये सांगता येतील. राजकीय पक्षाच्या कोणत्याही कार्यकर्त्यामध्ये गुणदोष हे असणारच. कार्यकर्ता हा परिपूर्ण असावा, सर्वगुणसंपन्न असावा अशी अपेक्षा आपण केली असली तरी तो तसा असेलच असे नाही, किंबहुना तो कधीच तसा असणार नाही. परंतु त्याच्या चुकांची बाजू प्रसार

..... के 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

माध्यमे नेहमीच आपल्या समोर मांडत असतात. पण त्याची जी काही व्यक्ती वैशिष्ट्ये आहेत, ज्या गोष्टीत त्यांनी आपले सारे जीवन झोकून दिलेले आहे, ती वैशिष्ट्ये मात्र कोणीही सांगत नाही. आणि वसंतराव काळ्यांच्या बाबतीत त्यांचे सगळ्यात मोठे वैशिष्टय कोणते असेल तर प्रसंगी सत्ताधारी पक्षाच्या विरूद्ध देखील, सत्ताधारी पक्षात असूनही, एक जबरदस्त आवाज उठविण्याची ताकद त्यांची होती. ते मला या बाबतीत नेहमीच म्हणावयाचे की, श्रीकांत काहीही झाले तरी मराठवाड्याच्या प्रश्नाविषयी आपण कोठल्याही पक्षात असलो तरी एकत्र राहिले पाहिजे. त्यामुळे मला वाटते की, मराठवाड्यातील एवढे धुरंधर राजकीय व्यक्तिमत्त्व, पण त्याला त्याही पक्षाने पुरेसा न्याय दिला नाही. शेवटी मराठवाड्यातील मंत्रिमंडळाच्या बैठकीवर मोर्चा काढण्याचा प्रसंग आला. त्यावेळेस मी त्यांना म्हटले की, वसंतराव तुम्ही खूप मोर्चे काढलेत, आता मला तरी काही मोर्चे काढू द्यात. तुम्ही आता लाल दिव्याच्या गाडीत बसण्याच्या दृष्टीने प्रयत्न करा. त्यावर ते मला म्हणाले की, श्रीकांत माझा तसा स्वभावच नाही. मला ते जमणार नाही. माझ्या ते रक्तातच नाही. संघर्ष करणे, प्रस्थापितांच्या विरूद्ध लढणे हेच माझ्या रक्तामध्ये आहे. मला वाटते त्यांची ही बाजू येथे मांडणे हीच त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणे होईल. हे मला आजच्या या शोक प्रस्तावाच्या वेळी मला सांगावयाचे होते. ते सांगून, मी माझ्या या मित्राला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

***

( यानंतर श्री. बरवड .... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे. कै. वसंत शंकरराव काळे यांच्याबद्दल या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कै. वसंतराव काळे यांच्याशी माझा अनेक वर्षापासून अतिशय जवळचा संबंध होता. अनेक चळवळींमध्ये, अनेक कार्यक्रमांमध्ये, अनेक उपक्रमांमध्ये आम्ही एकत्र राहिलो. आम्ही एकत्र काम केले. आम्ही पक्षात सुध्दा एकत्र काम करीत होतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या गुणांचे अतिशय चांगल्या पध्दतीने वर्णन कले. त्यांचा सर्वात महत्वाचा आणि मोठा गुण म्हणजे ज्या ठिकाणी काही चूक दिसेल, ज्या ठिकाणी काही वाईट दिसेल, ज्या ठिकाणी अन्याय दिसेल त्या ठिकाणी समोर कोण आहे आणि कोणाकडून अन्याय होत आहे हे न पाहता अन्यायाविरुध्द उभे ठाकणे याला त्यांनी सातत्याने महत्व दिले. लहानपणापासून त्यांचा हा जो गुण होता तो त्यांनी शेवटपर्यंत टिकवून ठेवला होता. ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आणि अन्य सन्माननीय सदस्य त्यांचे कौतुक करतात तसेच अनेक सन्माननीय सदस्य त्यांच्यावर टीका सुध्दा करतात. परंतु त्यांनी त्यांचा गुण कधीही सोडला नाही. त्यांनी प्रामाणिकपणा कधीही सोडला नाही. ग्रामपंचायतीपासून सुरुवात करुन ते तीन वेळा विधान परिषदेवर निवडून आले. ते कसे निवडून आले, काय झाले त्याबद्दल जास्त न बोललेले बरे. ते कसे निवडून आले यापेक्षा मी असे म्हणेन की, मराठवाड्यातील जेवढे तालुके आहेत त्यामध्ये एकही तालुका किंवा मराठवाड्यातील एकही शाळा किंवा कॉलेज असे सापडणार नाही की, ज्या ठिकाणी श्री. वसंतराव काळे पोहोचले नाहीत. सुरुवातीला ते पदवीधर मतदारसंघातून निवडून आले. त्यानंतर पुन्हा ते पदवीधर मतदारसंघातून निवडून आले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांच्या विरुध्द लढविलेल्या निवडणुकीच्या वेळी त्यांचा पराभव झाला. अनेकांनी सांगितले की, श्री. वसंतराव काळे आता परत सभागृहात येणार नाहीत. परंतु त्यानंतर शिक्षक नसणारा माणूस शिक्षक मतदारसंघातून निवडून यावा आणि बाकीच्या इतर सर्व उमेद्‌वारांचे डिपॉझीट जप्त करुन निवडून यावा अशा पध्दतीने ते निवडून आले. अल्पावधीमध्ये त्यांनी ते सहज शक्य केले. त्याचे कारण असे की, त्यांचा संपर्क खूप होता आणि त्या संपर्कामुळेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT

श्री. विनायक मेटे .....

दुर्दैवाने त्यांचा बळी गेला असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्यांना दम्याचा ॲटॅक आला आणि त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. त्यांना असा ॲटॅक येण्याची ही पहिली वेळ नसून ही दुसरी, तिसरी वेळ होती. दोन तीन वेळा ते जाता जाता परत आले असे म्हटले तर वावगे होणार नाही. हिवाळी अधिवेशनाच्या वेळी सुध्दा नागपूरला मी स्वत: त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले आणि ॲडमिट केले. परंतु त्या ठिकाणी ते एकच दिवस थांबले. दुसऱ्या दिवशी ते थांबले नाहीत. कारण बाहेर लोक बघावयास येत होते. आपल्याला प्रश्न विचारावयाचे आहेत, माननीय मंत्रिमहोदयांकडे काम आहे, सरकारकडे काम आहे, विधान परिषदेमध्ये आपल्याला आवाज उठवावयाचा आहे म्हणून ते हॉस्पिटलमध्ये सुध्दा थांबले नाहीत. ते हॉस्पिटलमधून परत आले. औरंगाबादमध्ये सुध्दा ते आजारी असताना घरी न थांबता ते दौऱ्यावर गेले. दौऱ्यावर जात असताना त्यांना ॲटॅक आला तरीही ते थांबत नव्हते. शेवटी रस्त्यावर पडण्याची वेळ आली. त्यांना उचलून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्या ठिकाणी डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करुन त्यांना वाचविले. कार्यकर्त्यांकरिता काम, काम आणि कामच करण्याचे उद्दिष्ट त्यांनी ठेवले होते. त्यांना शेवटचा जो ॲटॅक आला त्यावेळी सर्व मित्रांबरोबर गप्पा मारत असताना त्यांना ॲटॅक आला. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी या सभागृहाच्या माहितीसाठी सांगेन की, ते गप्पा मारत असताना त्यावेळी डॉ. चिंधे आणि अन्य दोन तीन डॉक्टर्स सुध्दा तेथे होते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनायक मेटे...)

ॲटॅक आल्याबरोबर त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. श्री.दिलीप वळसे पाटील, श्री.आर.आर.पाटील, श्री. अजित पवार यांना हे समजताच क्षणी त्यांनी त्यांच्यावरील वैद्यकीय उपचाराच्या बाबतीत कोणतीही हयगय होऊ दिली नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेब जे बोलले ते त्यांनी बोलायला नको होते. रेकॉर्डवर काही चुकीचे राहू नये म्हणून मी स्पष्टीकरण देत आहे एवढेच. त्यांच्यावरील वैद्यकीय उपचाराबाबत बिलकूल हयगय किंवा दुर्लक्ष झाले नाही. इतकेच नव्हे तर त्यांना चांगली वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून एक नव्हे, दोन नव्हे तर तीन विमाने पाठवून त्यांना मुंबईला आणण्यात आले. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी मुंबईतीलच नव्हे तर परदेशातील तज्ज्ञ डॉक्टर आणण्याचे काम देखील आमच्या पक्षाने तसेच सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी केले. मराठवाड्याच्या विकासाच्या संदर्भात, पाणी परिषदेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी भरीव काम केलेले आहे. असा हा थोर समाजसेवक आपल्यातून निधून गेला त्याचे फार मोठे दु:ख आपणा सर्वांना आहे.

तसेच कै. ईश्वर बगाजी देशमुख व कै. देविदास नामदेव भोळे या माजी सदस्यांच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.बरवड 15:15

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री नामदार श्री. आर.आर.पाटील यांनी सभागृहाचे विद्यमान सदस्य कै.वसंतराव काळे तसेच माजी सदस्य कै. ईश्वर बगाजी देशमुख व देविदास नामदेव भोळे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यास मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

या सभागृहाचे विद्यमान सदस्य श्री. वसंतराव काळे यांचे 2 फेब्रुवारी 2006 रोजी दु:खद निधन झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सरपंच या पदापासून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. सहकार क्षेत्रात अनेक संस्थांवर कार्यरत राहून त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. या सभागृहात त्यांना तीन वेळा निवडून येण्याचा बहुमान मिळालेला होता. कै. वसंतराव काळे हे माझे अत्यंत जिव्हाळयाचे मित्र होते.

या सभागृहाचे माजी सदस्य कै. ईश्वर बगाजी देखमुख व कै. देविदास नामदेव भोळे यांचेही दु:खद निधन झाले आहे. या तिन्ही सदस्यांना मी माझ्या पक्षाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : या सदनाचे नेते आणि उपमुख्यमंत्री यांनी या सदनाचे सदस्य कै. वसंत शंकरराव काळे, कै. ईश्वर बगाजी देखमुख आणि कै. देविदास नामदेव भोळे यांच्याबद्दल जो श्रध्दांजलीचा ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

कै. वसंत काळे यांचा आणि माझा विद्यार्थी आंदोलनापासून चांगला परिचय होता. नंतरच्या काळात राजकारणामध्ये ब-याच घडामोडी झाल्यानंतर 1970 ते 1980च्या दरम्यान जी एक विद्यार्थी आणि युवकांची पिढी महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी संघर्षाचा स्फुलिंग घेऊन काम करायला लागली, प्रस्थापितांच्या बाबतीत संघर्ष घडवून सामाजिक विकासाची बांधिलकी ठेवून कार्य करायला लागली त्या पिढीचे कै. वसंत काळे हे प्रतिनिधी होते असे मला वाटते. 1970 ते 19780च्या दरम्यान आणि त्यानंतरच्या काळात युवकांचा एक प्रचंड असा नवनिर्माणाचा लढा मराठवाडयामध्ये उभा राहिला आणि त्यातूनच कै. काळे यांचे नवे नेतृत्व उभे राहिले. कै. काळे यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलुंचे वर्णन अनेक माननीय सदस्यांनी केले आहे. त्याबरोबरच न दमता, स्वत:च्या प्रकृतीकडे लक्ष न देता जनतेसाठी सातत्याने काम करीत राहाणे आणि कुणाचेही हितसंबंध दुखावण्यासाठी न डगमगणे ही त्यांच्या व्यक्तिमत्वातील वैशिष्ट्ये होती. त्यांना काय प्राप्त व्हायला हवे होते आणि काय नको होते या चर्चेत जाण्यापेक्षा या सदनामध्ये मांडलेल्या प्रस्तावावर सहभावना व्यक्त करीत असताना मला असे सांगावेसे वाटते की,

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 15:20

डॉ. नीलम गोऱ्हे ...

मराठवाडयातील दुर्लक्षित गावांमध्ये उपेक्षित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी या सदनाच्यामार्फत कार्य करुन जर कै.काळे यांच्या अपुऱ्या कार्याची परिपूर्ती केली तर त्यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली अर्पण केल्यासारखे होईल. विद्यार्थी चळवळीच्या माध्यमातून आणि औरंगाबादमध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनामध्ये अनेक वेळा त्यांची व माझी भेट झालेली होती. अशा या ज्येष्ठ दिवंगत सदस्याला मी श्रध्दांजली अर्पण करते. त्याचप्रमाणे कै. ईश्वर देशमुख व कै. दे.ना.भोळे या माजी ज्येष्ठ सदस्यांनाही मी श्रध्दांजली अर्पण करते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव सदनासमोर ठेवलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या सदनाचे विद्यमान सदस्य कै. वसंतराव काळे तसेच कै. ईश्वर देशमुख आणि कै. दे.ना.भोळे या दिवंगत माजी सदस्यांबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. विद्यमान सदस्य कै. वसंतराव काळे यांच्याबद्दल अनेक सदस्यांनी आपले मत या ठिकाणी व्यक्त केलेले आहे. श्री. श्रीकांत जोशी यांनी या सदनामध्ये भाषण करताना सांगितले की, कै.काळे यांच्या निवडणुकीच्या वेळी सगळया मिडियाला आमचा उमेदवार निवडून येणार असे सांगत असताना कै. काळे हे निवडून आले. हेच कै. काळे यांच्या निवडणुकीचे रहस्य होते. लहान लहान गावांमध्ये मतदारांची नोंद कशी करावयाची हे त्यांना चांगले अवगत होते तसेच त्यांचा दांडगा जनसंपर्क होता. सगळया लोकांना आपल्या निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घ्यावयाची त्यांना जी हातोटी होती आणि सगळयांना सोबत घेऊन जाण्याची त्यांच्याकडे कला होती त्याचाच परिपाक म्हणून ते सदनामध्ये निवडून आले होते. प्रत्येक विषयावर ते आपली मते परखडपणाने मांडत असत. औरंगाबादमध्ये विविध व्याख्याने आणि कार्यक्रम ते आयोजित करीत असत. या सदनाच्या माध्यमातून त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आम्हांला ऐकायला मिळाली. कै. काळे हे ग्रामीण भागातून सरपंच पदापासून या सदनाचे सदस्य होईपर्यंत त्यांचा प्रवास हा खरोखरच त्यांच्या मेहनतीचे आणि कष्टाचा होता. त्यांची आणि माझी भेट 20 जानेवारी 2006 रोजी झाली होती. मी अंबाजोगाईला कार्यक्रमासाठी जात होतो आणि ते परत येत होते तेव्हा त्यांनी गाडी थांबवून माझ्याशी चर्चा केली. ती त्यांची आणि माझी शेवटची भेट ठरली. मनाने अतिशय निर्मळ असणारा आमचा सहकारी आम्हांला अर्धवट सोडून गेला . सदनातील त्यांची मुदत संपण्यापूर्वीच त्यांचे दु:खद निधन झाले. याप्रसंगी मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचप्रमाणे कै. ईश्वर देशमुख आणि कै. दे.ना. भोळे या ज्येष्ठ सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल माझ्या वतीने शोक व्यक्त करुन श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल.ऐनापुरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सदनाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर सहमती व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. विशेषत: कै. वसंतराव काळे यांची सदस्यत्वाची मुदत शिल्लक असताना त्यांचे निधन झाले त्यामुळे दु:ख होणे स्वाभाविक आहे. कै. काळे आणि माझा परिचय गेल्या 20 वर्षापासून होता. विद्यार्थी चळवळीमध्ये मी पश्चिम महाराष्ट्रात आणि ते मराठवाडयात काम करीत होते. मला आठवते की पश्चिम महाराष्ट्रातील बरीच कॉलेजेस् मी त्यांना फिरुन दाखविली होती. त्यावेळी ते म्हणत असत की, पश्चिम महाराष्ट्राचा द्वेष करीत असताना येथील लोक कष्टाळू आहेत आणि संस्था कशा उभ्या राहिल्या हे पाहिले की आम्ही तुमच्या पासंगाला देखील पुरत नाही. विद्यापीठाच्या सिनेटवर निवडून देण्यासाठी मी कै. काळे यांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या मदत केली होती. विद्यापीठांच्या अनेक समित्यांवर ते काम करीत होते.

यानंतर श्री. खर्चे पी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. ऐनापुरे .........

चौकशी करण्याची त्यांची पध्दती फार चांगली असायची. ते एखादया कॉलेजमध्ये आल्यानंतर ज्याची चौकशी करायची आहे त्यालाच बोलावून घेत होते. त्याला विचारत असत की तू सुधारत आला तर तूच रिपोर्ट लिहायचा. मी त्यांना याबाबतीत विचारले असता ते म्हणाले की ती व्यक्ती जर सुधारायला तयार असेल तर त्याला प्रथम संधी द्यायची, एकाच्या चुकीमुळे संस्था बंद पडता कामा नये. म्हणून तो सुधारत असेल तर संस्था वाढेल, अशा प्रकारची त्यांची पध्दती असायची. विशेषत: मराठवाडयातील शिक्षक मतदारसंघातून निवडून आल्यानंतर त्यांनी दोन तीन महत्वाच्या व जिव्हाळयाच्या प्रश्नांना हात घातला होता. त्यावर आमच्या शिक्षक प्रतिनिधींमध्ये चर्चा देखील झाली होती. राज्यात 7500 च्या वर असे पदवीधर व पदव्युत्तर शिक्षक आहेत की त्यांना नेट व सेटची परीक्षा पास नसल्यामुळे केवळ 8000 च्याच वेतनश्रेणीमध्ये काम करावे लागत आहे. माननीय श्री. वसंतराव काळे यांच्या निधनापूर्वी तीन आठवडे अगोदर त्यांनी मला फोन केला व सांगितले की, माझ्या डोक्यात एक कल्पना आहे. ते म्हणाले की, मी दिल्लीला गेलो होतो. तेथे माननीय श्री. शरद पवार साहेबांना भेटून आलो. मला वाटते आपण या प्रश्नाच्या संदर्भात यु.जी.सी. लाच घेराव घालावा. मी त्यांना म्हणालो की, हे कसे शक्य आहे ? यु.जी.सी. सारख्या स्वायत्त बॉडीला सर्व संस्थावाले घाबरतात, त्या स्वायत्त बॉडीला आपण घेराव घालावा कसा ? त्यावर ते म्हणाले की, त्यात काय अवघड आहे, आपण दोन हजार लोक आणा, मी दोन तीन हजार लोक घेऊन येतो. अशा प्रकारे सिम्बॉलिकेत प्रयत्न तरी करु या. राज्यात 7 हजाराच्या वर एम.ए. फर्स्ट क्लास शिक्षक असतांना केवळ नेट-सेटची परीक्षा नाही म्हणून त्यांना यु.जी.सी. च्या स्केलनुसार पगार मिळत नाही यासंबंधी आम्ही चर्चा करणारच होतो परंतु तेवढयातच त्यांचे दु:खद निधन झाले. त्याचबरोबर ज्युनियर कॉलेजच्या लोकांचे प्रश्न त्यांनी अत्यंत जिव्हाळयाने मांडले. कारण ज्युनियर कॉलेजची आज "ना घर का ना घाट का " अशी परिस्थिती झालेली आहे. परंतु त्या काळात एकमेव श्री. वसंतराव काळे यांनी शिक्षण संचालक आणि शिक्षण मंत्र्यांबरोबर वाद घालून या लोकांना न्याय मिळवून दिला आहे. तसेच डी.एड. कॉलेजच्या प्राध्यापकांची देखील तीच अवस्था होती, कारण ते अल्पसंख्य होते, त्यांनाही कोणीच विचारत नव्हते. त्या काळात त्यांचेही प्रश्न सोडविण्यासाठी कसोशीने प्रयत्न काळे यांनी केले. परंतु आज

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापुरे .........

दुर्देवाने ते आपल्यातून निघून गेल्यामुळे शिक्षक चळवळीला फार मोठा धक्का बसला आहे. ईश्वर त्यांच्या तसेच श्री. देशमुख व श्री. देविदास भोळे यांच्या मृतात्म्याला सद्गती देवो अशी प्रार्थना करतो व माझे दोन शब्द संपवितो.

------------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती** : या सदनाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर मी माझे विचार मांडत आहे.

या सदनाचे सदस्य आणि मराठवाडयातील एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. वसंतराव काळे हे परिचित होते. मी ज्यावेळी आमदार म्हणून काम करीत होतो त्यावेळी माझ्या मागील बाकावर बसणारे श्री. वसंतराव काळे हे अनेक प्रश्न, चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करीत होते. सदनात चर्चेच्या माध्यमातून अनुदान मिळविण्याच्या अनुषंगाने आपले परखड मत ते नेहमीच मांडत असत. असा एक परखड विचाराचा, ध्येयवादी व अत्यंत चांगला अभ्यास असणारा, त्याचबरोबर एखादा प्रश्न हाती घेतल्यानंतर शेवटपर्यंत कितीही अडचणी आणि संकटे आली तरी त्या संकटांवर मात करुन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारा, एक लोकप्रतिनिधी आपल्यातून गेला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी आपण पाहतो की, आपल्या वक्तव्याने कोणी दुखावते काय आणि दुखावला तर काय करायचे म्हणून अनेक ठिकाणी अनेक लोक मनात असून सुध्दा काही गोष्टी बोलण्याचे टाळतात. पण माननीय वसंतरावांचे व्यक्तिमत्व बघितले तर एक गोष्ट लक्षात येते की, त्यांच्या मनात ज्या व्यथा असायच्या, ज्या पध्दतीच्या भावना असायच्या त्या व्यथा सोडविण्याच्या अनुषंगाने कोणीही दुखावले तरी त्याची भीड न बाळगण्याची जी मानसिकता होती ती खऱ्या अर्थाने वसंतरावांच्या बाबतीतील फार मोठे शब्दांचे शस्त्र होते असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

यानंतर श्री. भारवि .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MAP/ प्रथम श्री.खर्चे... 15:30

मा.सभापती....

त्यांच्या अनेक सहकार्यांनी सांगितले की, यश आले तरी, ते बेहोश होत नसत आणि अपयश आले तरी ते खचून जात नसत. असा वेगळया पध्दतीचा त्यांचा स्वभाव होता म्हणूनच त्यांनी मराठवाडयातील प्रश्नांसंबंधी अनेक पध्दतीने संघर्ष केला. शिक्षण क्षेत्रामध्ये देखील त्यांनी काम केले आहे. सरपंच किंवा लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना सामान्य समाजाची त्यांनी अत्यंत तळमळीने सेवा केली आहे. विद्यार्थी चळवळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नासंबंधी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शिक्षक प्रतिनिधी म्हणून विना अनुदान तत्त्वावरील शिक्षण असेल, उच्च माध्यमिक शिक्षकांचे प्रश्न असतील यासंबंधी उत्कृष्ट काम करून मराठवाडयामध्ये खऱ्या अर्थाने चांगल्या पध्दतीचा इतिहास घडविला. अशा कर्तृत्त्वसंपन्न लोकप्रतिनिधीसंबंधी एवढया लवकर शोक प्रस्ताव मांडण्याची वेळ येईल असे तुम्हा-आम्हाला नागपूरमध्ये कधी वाटलेसुध्दा नसेल. नागपूर अधिवेशनामध्ये मी 2-3 वेळा असे पाहिले की, एखादा प्रश्न त्यांना मांडावयाचा असेल आणि सभापती या नात्याने मी परवानगी दिली नाही तर ते तळमळत असत. त्यांना अनुमती देणे आवश्यक आहे असे मला वाटल्याने मी त्यांना अनेक वेळा सातत्याने सहकार्य केलेले आहे. शेवटी, तुम्ही-आम्ही लोकप्रतिनिधी, समाजातील तळागाळातील जो असंघटित समाज आहे, त्या समाजावर अनेक पध्दतीने अन्याय होतो, तो दूर करण्याच्या दृष्टिने सभागृहामध्ये सतत येत असतो. जे खरे आहे ते बोलू, अत्यंत प्रामाणिकपणे बोलू, एखाद्याचे मन दुखावले, सत्तेतील मोठी व्यक्ती दुखावली तरी असंघटित समाजाच्या अनुषंगाने जे आवश्यक आहे ते बोलण्याची मानसिकता कै.वसंतराव काळे यांच्यापासून आपण घेतली तर खऱ्या अर्थाने त्यांना श्रध्दांजली वाहिल्यासारखे होईल.

कै.ईश्वर बगाजी देशमुख हे स्वातंत्र्य चळवळीमध्ये वाढलेले विदर्भातील व्यक्तिमत्त्व आहे. स्वातंत्र्य संग्रामातील चळवळीमध्ये काम केल्यामुळे त्यांनी अनेक वेळा कारावास देखील भोगला. एवढेच नव्हे तर त्यांनी शिक्षण क्षेत्रात देखील अत्यंत चांगले काम केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै.श्री.देविदास नामदेव भोळे आणि मी सन 1978 मध्ये एकत्रित काम केले आहे. त्यानंतर कै.भोळे यांना विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. अत्यंत विशाल मनाचा, सामान्य समाजाच्या अनेक प्रश्नाची जाण असलेला, कष्टकरी शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणारा, खानदेश मधील हा नेता विधिमंडळाचा सदस्य म्हणून नेहमीच कार्यरत राहिला. असे हे थोर तीन सन्माननीय सदस्य आपल्यातून निघून गेले आहेत. सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला त्याला मी आपणा सर्वांच्या वतीने पाठिंबा देतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

....

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक गुरुवार, दिनांक 16 मार्च, 2006 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 3 वाजून 36 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 16 मार्च ,2006 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही